No. of Printed Pages : 7 **FMT–01**

# BACHELOR DEGREE PROGRAMME (BDP)

## Term-End Examination

## June, 2024

### FMT–01 : FOUNDATION COURSE IN MARATHI

*Time : 2 Hours* *Maximum Marks : 50*

---

**नोट :** सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.

---

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

(क) विज्ञानयुग आणि मानवी जीवन

(ख) एक आपघात

(ग) थोर पुरुष

(घ) पावसाळयातील दिवस

**P. T. O.**

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 8

(क) 'तुका झाला से कळस' अभंगाव्दारे स्पष्ट करा:

(ख) केशवसुतांच्या मते कवी जगात संचार कसा करतो ?

(ग) मर्ढेकरांच्या कवितेतील प्रतिक आणि प्रतिमा स्पष्ट करा.

(घ) अक्काच्या मते माहेरचे अणुरेणू मंगलमय कसे होतात ?

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(क) 'वळीव' कथेत उन्हाने तात्याची अवस्था कशी झाली ?

(ख) चेलमा म्हणजे काय ? स्पष्ट करा.

(ग) आकाश एक अलौकिक मौनीबाबा उसे का म्हटले आहे ?

(घ) 'सांबरा'तील कुंजाचा स्वभाव वर्णन करा.

4. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : 6

(क) गुंड्याभाऊच्या जीवाची मुंबई

(ख) स्वावलंबी शिक्षण

(ग) न्यायाधीशाची प्रतिष्ठा आणि कार्य

(घ) बालगंधर्वाचे प्रयोगातील श्रम

5. विभक्ती म्हणजे काच ? तृतीया विभक्तीची **तीन** अनेक वचनी रूपे सांगा. 5

**किंवा**

खालील ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळीत विस्तार करा :

(क) घरची करते देवा देवा बाहेरची ले हलवा मेवा

(ख) गरज सरो वैद्य मरो

(ग) वासरात लंगडी गाय शहाणी

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्यप्रचारांचा अर्थ सांगा : 3

(क) घर डोक्यावर घेणे

(ख) अंग कादून घेणे

(ग) काणा डोळा करणे

(घ) खडे फोडणे

(ङ) कोंडमारा होणे.

**किंवा**

खालील **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(क) सासू मेली उन्हाळ्यात आसू आले पावसाळ्यात

(ख) हत्तो गेला अन् शेपूट राहिले

(ग) वाकड्या बोटा शिवाय तूप निघत नाही

(घ) हजीर तो वजीर

(ङ) शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(क) ललित लेखकाच्या मन:स्थितीचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

(ख) 'एक मनुष्य एक मूल्य' हे तत्त्व लोकशाहोचा आत्मा आहे, चर्चा करा.

(ग) कर्मवीर भाऊरावांना स्वावलंबी शिक्षणाची गरज का वाटली ?

(घ) स्त्रियांच्या विकासाचे कार्यक्रम थोडक्यात सांगा.

8. खालील इंग्लिश उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

On day, while he was on his drive, he was three sights. These were of an old man, a sickman, dead man. All the three had such an adverse effect on him that he began to grive when he thought that the world in which he was living was full of miseries and sorrows. While rising and sitting, sleeping and walking these three sights always loomed up before this eyes. There was a strom in his heart. He wanted to find a cure to all these ills. So one midnight he deserted his wife Yasodhara and child Rahul,

and drove out in search of truth. No doubt, he loved his wife and child. But he loved humanity more, when his carriage came to river, he sent back his driver Chandak.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

मोहन पलिकडे उतरला त्यावेळी समोरील गावा मागे सूर्य मावळत होता. सूर्याचा साम्य सोनेरी प्रकाश विस्तीर्ण तलावाला उजळून गावातील रेखीव रस्त्यावर पसरला होता. त्याच्या चारही बाजूंनी लालभडक मोहोरांच वृक्ष होते, आणि त्या लाल फुलांना सूर्यप्रकाशात सोन्याचे व्हावे की सच्चे रक्तलाल राहावे याचा संभ्रम झालेला दिसत होता. चौकाच्या एका बाजूला वृक्षायागे प्रचंड तटासारखा भितींचा एक वाडा होता. व त्याला काचेची तावदाने असलेली एकच खिडकी होती. ती खिडकी व वाड्याचा विशाल अवजड लाल रंगाचा दरवाजा दोन्ही बंद होती.

परन्तु रस्त्यावर मात्र उत्साहान हातवारे करत बोलत जाणाऱ्या स्त्रीपुरुषांयी आकर्षक रहदारी होती. ते सुखी स्त्रीपुरुष आणि चौकात स्वच्छंद बागडणारी मुले यांच्याकड़े पाहताच घरच्या आठवणींने त्याचे मन दुखावले, पण लौकरच आपली बायको देखील या रस्त्याने अशीच सुखात फिरेल, आपली मुले या मुलांसोबत हिंडून आनंदाने खेळत राहतील, या चित्राने त्याच्यात पुन्हा सुखाची उब निर्माण झाली. फुललेल्या माननेच त्याने उतरणीचा उरलेला भाग पावलांमागे टाकला व तो गावात आला.